पुढारी

# पंच्याहत्तरी पूर्ण सभासदांच्या ठेवींना ८.५० टक्के व्याजदर

## एम. एल. चौगुले : रवळनाथच्या २७ व्या वार्षिक सभेत घोषणा

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केलेल्या ज्येष्ठ सभासदांच्या सन्मानासाठी २१ महिने मुदतीच्या ठेवींना ८.५० टक्के व्याजदर देण्यात येईल, अशी घोषणा श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीचे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केली. येथील श्री गणेश सांस्कृतिक भवनात आयोजित २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

मान्यवरांच्या हस्ते रवळनाथ, काळभैरव प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन झाले. सभेत जेष्ठ व सेवानिवृत्त सभासदांसह विविध परीक्षेतील यशवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला.

सीईओ डी. के. मायदेव यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. बोर्ड सेक्रेटरी सागर माने यांनी मागील सभेचा वृत्तांत वाचला. संचालक महेश मजती यांनी नफा विभागणी वाचन केले. संस्थाध्यक्ष चौगुले म्हणाले, सध्या महाराष्ट्र, कर्नाटक व दिल्ली असे संस्थेचे कार्यक्षेत्र असुन गोवा कार्यक्षेत्र वाढीसाठी प्रयत्न सुरू आहेत. गडहिंग्लज प्रधान कार्यालयातील सुविधा केंद्रासह सध्या १२ शाखा असून कराड शाखाही लवकरच सुरू होत आहे. महाराष्ट्रातील पंढरपूर, सांगोला, तासगाव, बांदा, नवी मुंबई तर कर्नाटकातील धारवाड व चिक्कोडी येथे मिळून ७ नव्या शाखा सुरू करण्याचा संस्थेचा मानस आहे.




गडहिंग्लज : रवळनाथच्या २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना एम. एल. चौगुले. शेजारी प्रा. व्ही. के. मायदेव आदी.

प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर यांनी अंदाजपत्रक वाचन केले. प्रा. विजयकुमार घुगरे यांनी वैधानिक लेखापरीक्षण अहवाल स्वीकृती व लेखापरीक्षण अहवाल दोष दुरुस्तीसह वाचन केले. प्रा. विजयकुमार आरबोळे यांनी संचालक व नातेवाईकांकडील येणे कर्ज यादी वाचन केले. रेखा पोतदार यांनी वैधानिक लेखापरीक्षक नेमणुकीचा ठराव तर कार्यक्षेत्र वाढीचा ठराव डॉ. संजय चौगुले यांनी मांडला. डी. के. मायदेव यांनी पोटनियम दुरुस्ती वाचन केले. प्रा. डॉ. किरण पोतदार यांनी नवीन शाखांचा ठराव माडला. थकीत कर्ज खाती सूट रक्कम मान्यतेचा ठराव उमा तोरगल्ली यांनी मांडला. यावेळी संचालक, सर्व शाखांचे शाखा सल्लागार, सभासद, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कल्पना पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.